# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.१२/१०/२०२२

## प्रेसनोट

'जागतिक बेघर दिन' निमित्त दि.१० ऑक्टोबर २०२२ रोजीपासून महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व वसई विरार शहर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (Day-NULM) अंतर्गत बेघर नागरिकांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर उपक्रमांचे उद्घाटन वसई विरार शहर महानगरपालिका प्रथम महिला महापौर सौ.प्रविणा ठाकूर यांच्या शुभहस्ते वालीव येथील शहरी बेघर केंद्रात करण्यात आले. सदर उपक्रम महानगरपालिकेच्या शहरी बेघर केंद्र, बेलची पाडा, रेमी इंडस्ट्रीज जवळ, वालीव, वसई पूर्व तसेच शहरी बेघर निवारा केंद्र, वालईपाडा, संतोष भुवन, नालासोपारा पूर्व या दोन ठिकाणी करण्यात आले.

बेघरांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत बेघरांचे सर्वेक्षण, बेघरांसाठी आधारकार्ड कॅम्पचे आयोजन, त्यांच्या आरोग्याची तपासणी शिबीर, शालेय विद्यार्थी चित्रकला व निबंध स्पर्धा, जाणीव जागृती शासकीय विभागांशी कृतीसंगम, निवारा निर्जंतुकीकरण व सजावट इ. उपक्रम यावेळी राबविण्यात आले.

त्याचप्रमाणे जागतिक बेघर दिनाचे औचित्य साधून दि.११ व १२ ऑक्टोबर २०२२ रोजी 'घर आणि बेघर', 'माझी वसुंधरा' इ. विषय घेऊन शाळांमध्ये चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजनही महानगरपालिकेमार्फत करण्यात आले तसेच शेवटी विद्यार्थ्यांना हरित शपथ देणेत आली. वालीव येथील औद्योगिक कारखान्यांच्या असोसिएशनच्या माध्यमातून दोन्ही बेघर निवारा केंद्रांवर टूथब्रश, टूथपेस्ट, डस्टिंग पावडर, आंघोळ व कपड्यांचे साबण समावेश असलेल्या बॉक्सचे वाटप करण्यात आले.

वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत बेघर नागरिकांना सेवा देण्याचे काम नियमितपणे पार पाडले जात असून 'जागतिक बेघर दिन' निमित्त दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत अति.आयुक्त श्री.अजिंक्य बगाडे, उप-आयुक्त श्री.किशोर गवस, नियंत्रक श्री.सुकदेव दरवेशी यांनी नियोजन केल्याप्रमाणे वरील उपक्रम महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहेत.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका